# पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (२०२५-२६) करिता ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत महत्वाच्या सूचना

- **उमेदवाराकडे पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजने अंतर्गत ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे आणि इतर बाबीं खालीलप्रमाणे.**

१. उमेदवाराकडे वैध आणि कार्यरत ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.

२. ऑनलाईन नोंदणी करतांना उमेदवाराने वैध आणि कार्यरत मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक आहे.

३. उमेदवारांकडे अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो व स्वाक्षरी खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

- रंगीत पासपोर्ट आकाराचा फोटो - कमाल १०० kb पर्यंत (केवळ jpg, jpeg, png format मध्ये)
- स्वाक्षरी - कमाल २० kb पर्यंत (केवळ jpg, jpeg, png format मध्ये)
- इतर सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्रे PDF Format मध्ये खालीलप्रमाणे असावे (कमाल २५० kb पर्यंत)
  - उमेदवारांचा जन्म दाखला / १० वी चे प्रमाणपत्र / पासपोर्ट /शाळा सोडल्याचा दाखला (यापैकी कोणतेही एक)*
  - आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसाहित)*
  - १० वी गुणपत्रिका / प्रमाणपत्र (दोन्हीही असेल तर एकत्रीत करून अपलोड करावे)*
  - १२ वी गुणपत्रिका / प्रमाणपत्र (दोन्हीही असेल तर एकत्रीत करून अपलोड करावे)*
  - पदवी गुणपत्रिका / प्रमाणपत्र
  - महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) *
  - आर्थिक वर्ष २०२३-२४ किंवा २०२४-२५ उत्पनाचे प्रमाणपत्र (संबंधित तहसीलदार यांनी निर्गमित केलेला असावा)*
  - जमात प्रमाणपत्र (नमुना 'क')*
  - जमात वैधता प्रमाणपत्र (नमुना 'ग')*
  - अनाथ प्रमाणपत्र (लागू असल्यास)
  - राजपत्र (Gazette) नावामध्ये बदल असल्यास (लागू असल्यास)

## शारीरिक पात्रता निकष

| पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण | | | सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण | | |
|---|---|---|---|---|---|
| **निकष** | **पुरुष** | **महिला** | **निकष** | **पुरुष** | **महिला** |
| वय | १८ ते ३३ वर्ष | | वय | १७ ते २१ वर्ष | |
| किमान उंची | १६० से.मी. | १५० से.मी. | किमान उंची | १६८ से.मी. | १५७ से.मी. |
| छाती | • न फुगवता - किमान ७९ से.मी.<br>• फुगवता = न फुगवता + किमान ५ से.मी. | निरंक | छाती | • न फुगवता - किमान ७७ से.मी.<br>• फुगवता = न फुगवता + किमान ५ से.मी. | निरंक |

***टीप- वयवर्ष गणना ही दिनांक ०१/०८/२०२५ या रोजीस गृहीत धरून करण्यात आलेली आहे.**

**उमेदवारांसाठी पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजने अंतर्गत ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता महत्वपूर्ण सूचना-**

१. उमेदवारांनी अर्ज सादर करण्याकरिता या कार्यालयाच्या दिलेल्या अधिकृत संकेतस्थळ- https://cpetp.trti-maha.in/candidateLogin या लिंकवरूनच अर्ज सादर करावेत. याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही लिंकद्वारे करण्यात आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

२. उमेदवाराला ऑनलाईन अर्जामधील पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असेल व अपूर्ण अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

३. उमेदवार यांनी ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर सदर अर्जाची प्रिंट काढून स्वत: कडे जतन करून ठेवावी. तसेच मूळ कागदपत्र तपासणी / पडताळणी वेळी उमेदवार यांना सदर ऑनलाईन अर्ज व इतर मूळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे छाननी करिता सादर करणे बंधनकारक राहील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**स्कॅनींग आणि दस्तऐवज अपलोड करण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे :**

- ऑनलाइन अर्ज करण्यापूर्वी, उमेदवाराने त्याचे छायाचित्र आणि स्वाक्षरीची स्कॅन केलेली (डिजिटल) प्रतिमा खाली दिलेल्या वैशिष्ट्यानुसार स्कॅन करणे आवश्यक आहे.

  - **छायाचित्र (Photo) :**
  - अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र फोटो असणे आवश्यक आहे.
  - हलक्या रंगाच्या शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीवर काढलेले रंगीत फोटो असावा.
  - तुमच्या फोटोमध्ये 'रेड-आय' नसल्याचे सुनिश्चित करावे.
  - जर तुम्ही चष्मा घालत असाल तर त्यात कोणतेही प्रतिबिंब दिसत नाही आणि तुमचे डोळे स्पष्टपणे दिसू शकतील याची खात्री करा.
  - डोक्यावर टोपी किंवा डोळ्यावर गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.
  - कोणत्याही वस्तू किंवा कपड्याने तुमचा चेहरा झाकलेला नसावा.
  - पासपोर्ट साईज फोटो – कमाल १०० kb पर्यंत (केवळ jpg, jpeg,png format मध्ये) असावा.

  - **स्वाक्षरी प्रतिमा (Signature) :**
  - अर्जदाराने पांढऱ्या कागदावर निळ्या/काळ्या शाईच्या बॉल पेनाने सही करावी.
  - स्वाक्षरी ही अर्जदारानेच केलेली असावी.
  - स्वाक्षरी – कमाल २० kb पर्यंत (केवळ jpg, jpeg format मध्ये) असावी.

## उमेदवारासाठी ऑनलाईन अर्जाबाबत सर्वसाधारण सूचना :

- उमेदवार यांनी ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या मार्फत अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्राची छाननी ऑनलाईनरित्या व कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) या तंत्रज्ञानाद्वारे करण्यात येईल. त्याअनुषंगाने प्राप्त अर्जाचे अवलोकन केल्यानंतर काही त्रुटी आढळल्यास ऑनलाईन लॉगीनद्वारे उमेदवारास कळविण्यात येईल.
- ऑनलाईन द्वारे अपात्र (Reject) करण्यात आलेल्या अर्जाची त्रुटी पूर्तता करण्यासाठी उमेदवार यांनी त्यांच्या संबंधित लॉगीनद्वारेच आवश्यक कागदपत्रे अपलोड करावे. उमेदवार यांची ऑनलाईन छाननी असल्या

कारणामुळे सदरचे आवश्यक दस्तवेज कागदपत्रे हे कोणत्याही स्वरुपात या कार्यालयास ऑफलाईन किवा ई-मेल द्वारे सादर करण्यात येऊ नये. तसेच ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत ही **दिनांक १३/१०/२०२५ रोजी रात्री ११.५९ मिनिटापर्यंत** असून उमेदवार यांना त्रुटी पूर्तता करण्यासाठी **दिनांक १४/१०/२०२५ रोजी रात्री ११.५९ मिनिटापर्यंत** मुदत राहील.

- ऑनलाईन पोर्टल मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) या तंत्रज्ञानाचा वापर केला असल्यामुळे उमेदवार यांनी अर्जासोबत अपलोड करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राची खालीलप्रमाणे विशेष काळजी घेणे आवश्यक राहील.
  - Only PDF format is allowed for uploading documents except photo & sign.
  - Documents must be scanned (Not photos from mobile cameras)
  - Use 300 DPI (dots per inch) for scanning (Clear text & stamps)
  - Save in PDF directly from the scanner
  - Ensure the document is upright (Not rotated)
  - Do not crop -full page must be visible
  - Seals, stamps, and signatures must be clear
  - Text must be clear, dark, and readable
  - Ensure no blur, glare, shadow, or tilted scans
  - Avoid very light or black-and-white photocopies that lose details

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) या तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने उमेदवाराने कागदपत्रे व प्रमाणपत्रे अपलोड करताना उपरोक्त प्रमाणे दिलेल्या निकषांचे काळजीपूर्वक पालन करणे बंधनकारक असेल.

- उमेदवारांचे आर्थिक वर्ष २०२३-२४ किंवा २०२४-२५ यापैकी कोणत्याही एका वर्षाचे कुटुंबातील सर्व स्रोतामार्फत मिळणारे उत्पन्न रु. ८ लक्ष यापेक्षा जास्त असू नये.
- ज्या उमेदवाराकडे जमात वैधता प्रमाणपत्र नसेल अशा उमेदवारांनी 'आदि प्रमाण प्रणाली' (e-Tribe Validity Portal) मध्ये जमात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज करतेवेळी शैक्षणिक (Education), सेवा (Service), निवडणूक (Election) व इतर (Other) विकल्पापैकी **'इतर/Other'** विकल्प निवडून संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे ऑनलाईनद्वारे अर्ज सादर करण्यात यावा.
- अर्जातील तपशील / माहिती चुकीची अथवा अर्धवट ठेवल्यास / सादर केल्यास भविष्यात होणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी उमेदवार स्वत: जबाबदार राहील.
- सदर योजनेच्या किंवा ऑनलाईन अर्जाच्या अनुषंगाने उमेदवार यांना प्राप्त होणारे ई-मेल किंवा मोबाईल OTP कोणत्याही त्रयस्त व्यक्तीस देण्यात येऊ नये याची अर्जदाराने गंभीर नोंद घेण्यात यावी.
- उमेदवाराने ऑनलाईन अर्जाद्वारे सादर केलेली माहिती व तपशील प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर खोटी व बनावट असल्याचे आढळल्यास तो/ती कायदेशीर कारवाईस पात्र राहील.
- उमेदवार यांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना किमान पात्रता निकष पूर्ण केले आहेत याची खात्री करावी.

- उमेदवारांनी महत्त्वाचे अपडेट तसेच त्यासंबंधित देण्यात येणाऱ्या सूचना/माहितीसाठी वेळोवेळी संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

- **अर्ज भरतांना तांत्रिक अडचणी उद्भवल्यास,**

ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण/समस्या असल्यास खालील दिलेल्या ई-मेल अथवा दुरध्वनी क्रमांक यावर संपर्क साधावा.

- दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६३३०८५४ (कार्यालयीन वेळ- सकाळी ०९.४५ ते सायं ०६.१५)
- ईमेल आय डी - helpdesk.cpetptrti@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा.
- संस्थेचे संकेतस्थळ (website) : https://trti.maharashtra.gov.in

**स्वा-**
**(दिपा मुधोळ-मुंडे, भा.प्र.से.)**
**आयुक्त, आदिवासी संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था,पुणे**